
शैक्षणिक संदर्भ अंक १४६ (फेब्रुवारी - मार्च २०२४)

महा इतिहास - भाग २६

# दुभंगलेल्या जगाकडे वाटचाल - २

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे




महा इतिहास - भाग २६

# दुभंगलेल्या जगाकडे वाटचाल - २

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे**

*औद्योगिकीकरणाचा सर्वात मोठा जागतिक परिणाम म्हणजे युरोपीय देशांचा वसाहतवाद. यातून जगाचे अर्थकारण कसे पूर्णतः बदलून गेले व जग दोन गटांमध्ये कसे विभागले गेले, हे आपण मागच्या लेखापासून पहात आहोत. वसाहतवादाचा सर्वात मोठा बळी होता आफ्रिका खंड. याबद्दल चर्चा करू या या लेखात.*

१७व्या शतकानंतर युरोपीय - विशेषतः पोर्तुगीज दर्यावर्दी आफ्रिकेला वळसा घालून आशियात व्यापारासाठी येऊ लागले, तेव्हा ह्या सागरी प्रवासाच्या सोयीसाठी त्यांना आफ्रिका खंडाच्या पश्चिमेकडेच्या सागरी किनारपट्टीवर बंदरे उभी करणे गरजेचे वाटले. पोर्तुगीजांनी प्रथम आफ्रिकेच्या किनारपट्टीजवळील निर्मनुष्य बेटांवर वसाहती उभ्या केल्या. पण पोर्तुगीजांपाठोपाठ स्पॅनिश व डच व्यापारी जहाजेही या मार्गाने ये-जा करू लागली.





*पोर्तुगीज साम्राज्य व पोर्तुगिजांचा व्यापारी मार्ग (स्रोत - विकीपिडिया)*

आफ्रिकेतील पहिले आधुनिक शहर म्हणजे केपटाऊन. हे बंदर डच ईस्ट इंडिया कंपनीने १६५२ साली बांधले. १९व्या शतकात सुएझ कालव्याचा मार्ग उपलब्ध होण्यापूर्वी ब्रिटिश व्यापारी जहाजेही याच मार्गाने ये-जा करत होती.

अल्प कालावधीतच आफ्रिकेच्या पश्चिम किनारपट्टीचे वेगवेगळे भाग वेगवेगळ्या युरोपीय साम्राज्यांच्या नियंत्रणाखाली आले. याच बंदरांमधून आफ्रिकी गुलामांची वाहतूकही होत होती. अमेरिका खंडात व कॅरिबियन बेटांवर नव्याने उभ्या रहात असलेल्या युरोपीय वसाहतींना अंगमेहनतीच्या कामासाठी लागणारे गुलाम आफ्रिकेतून पुरवले जात होते. मुख्यतः मध्य व पूर्व आफ्रिकेतून धरून आणलेल्या माणसांची विक्री पश्चिम आफ्रिकेतील दलाल युरोपियनांना करत होते. साधारण १६व्या शतकात सुरू झालेला हा माणसांचा व्यापार १९व्या शतकापर्यंत चालू होता.

१८७० पर्यंत आफ्रिकेच्या किनारपट्टीवर युरोपीय साम्राज्यांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले असले तरी साधारण ९० टक्के अंतर्गत भूभाग त्यांच्या अधिकाराखाली नव्हता. आशियामध्ये युरोपीय साम्राज्ये स्थिरावल्यानंतर आफ्रिकेच्या या संसाधन-संपन्न भूभागाकडे युरोपीय राज्यकर्त्यांचे लक्ष वळणे साहजिकच होते. यावेळी आशियाप्रमाणेच आफ्रिकेतही वेगवेगळ्या मूलनिवासी वांशिक गटांच्या वसाहती होत्या. शेजार-शेजारच्या वसाहतींमध्ये काही ठिकाणी मैत्रीचे तर काही ठिकाणी वैराचे नाते होते. त्यांनी आपापल्या नियंत्रणांखालील भूभाग ठरवून घेतलेले होते. आशियाप्रमाणेच इथेही युरोपीय सागरी मार्गांनी येऊन काही समूहांशी व्यापारी संबंध प्रस्थापित करू पहात होते. मात्र आफ्रिकेतील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती आशियाच्या तुलनेत कमी गुंतागुंतीची होती, इथली लोकवस्ती बऱ्यापैकी विरळ होती आणि लोकांचे दैनंदिन जीवन आपल्या स्थानिक परिसंस्थांशी जास्त जोडलेले होते. आफ्रिकी गुलामांच्या व्यापारामुळे युरोपीय लोकांचा आफ्रिकी लोकांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन आशियातील लोकांबाबतच्या दृष्टिकोनापेक्षा वेगळा होता. हे सर्व रानटी व मागासलेले लोक असून त्यांना सभ्यता शिकवण्याचे पुण्यकर्म आपल्याला करायचे आहे, असा काहीसा आविर्भाव तत्कालीन युरोपीय लिखाणांतून व व्यवहारांतून दिसून येतो.

१८७६ साली जर्मन राज्यकर्त्यांच्या पुढाकाराने बर्लिन येथे युरोपातील तत्कालीन साती साम्राज्यांच्या पुढाकाराने एक बैठक झाली व या बैठकीत आफ्रिकेचे वेगवेगळे भाग आपसांत वाटून घेण्याचा करार केला गेला. या वाटाघाटींमध्ये आफ्रिकेतील राज्यकर्ते व लोकांचे मत विचारात घेण्याचा प्रश्नच नव्हता!




*आफ्रिका खंडाची सात साम्राज्यांमध्ये झालेली वाटणी (स्रोत – विकीपिडिया)*

१९१० सालापर्यंत आफ्रिकेच्या नव्वद टक्के भूभागावर सात युरोपीय साम्राज्यांचा पूर्ण कब्जा बसलेला होता. दुसऱ्या महायुध्दानंतर ज्याप्रमाणे आशियातून युरोपीय साम्राज्यांनी अंग काढून घेतले तसे आफ्रिकेतूनही काढून घेतले. आशियातून बाहेर पडताना प्रत्यक्ष जागेवर पहाणी न करता नकाशांवर रेघा मारून नव्याने स्वतंत्र होणाऱ्या देशांमधील सीमावादाची त्यांनी नांदी केली. भारताच्या शेजारी देशांना लागून असलेल्या सीमांवरील काही वाद अजूनही सुटलेले नाहीत याचे 'श्रेय' पूर्णतः ब्रिटिशांचे आहे. आफ्रिकेमध्ये तर

नकाशावरील भौगोलिक रचनांचीही दखल घेण्याची गरज कोणाला वाटली नाही. सरळ रेघा मारून नवे देश निर्माण केले गेले. उदाहरणादाखल शेजारी दाखवलेला पश्चिम आफ्रिकेचा नकाशा पहावा. या सीमा वेगवेगळ्या वांशिक गटांच्या क्षेत्रांनाही दुभंगून गेल्या व बऱ्याच ठिकाणी एकमेकांशी वैराचे नाते असलेल्या दोन वांशिक गटांच्या तुकड्यांना नव्याने स्वातंत्र्य मिळालेल्या एका देशात एकत्र नांदणे भाग होऊन बसले. आफ्रिकेतील अनेक देश अजूनही वांशिक वैरांतून उभ्या राहिलेल्या यादवी युध्दांमध्ये अडकून पडलेले आहेत, याला या युरोपीय राज्यकर्त्यांनी जाताजाता आखलेल्या सीमारेषा बऱ्याच अंशी कारणीभूत आहेत.




*पश्चिम आफ्रिकेचा स्वातंत्र्यानंतरचा नकाशा*
*(स्रोत – विकीपिडिया)*

युरोपीय राज्यकर्त्यांचा एकंदरीतच आपल्या अधिपत्याखाली आलेल्या आशिया व आफ्रिका खंडांकडे पहाण्याचा दृष्टिकोन हा आपण (म्हणजे युरोपातील गोरे लोक) सर्व मानवजातीत श्रेष्ठ आहोत व इतरांचा उध्दार करण्याचे दैवी कार्य आपल्याला करायचे आहे, असाच काहीसा होता. विशेषतः आफ्रिकी गुलामांना अमानुषपणे राबवण्याचे समर्थन करण्यासाठी काळे आफ्रिकी लोक म्हणजे माणूस नसून जनुकीयदृष्ट्या चिंपाझींच्या जवळची एक मानवी उत्क्रांतीच्या सर्वात खालच्या पायरीवरची प्रजाती आहे, तर युरोपीय गोरे लोक हे मानवी उत्क्रांतीचे परमोच्च शिखर आहे, असे स्वतःला व इतरांना पटवणे त्यांच्यासाठी


क्रमप्राप्त होते. यातला विरोधाभास हा की काळ्या केसांखाली चिंपाझींची त्वचा गोरी असते! युरोपीय वंशाच्या गोऱ्या लोकांनी उभ्या केलेल्या व युरोपीय साम्राज्यांशी युध्द करून स्वतंत्र झालेल्या संयुक्त संस्थानांना तुलनेने लगेचच मान्यता मिळाली व युरोपीय देशांबरोबर त्यांचे मित्रत्वाचे संबंधही प्रस्थापित झाले. त्याउलट आशिया व आफ्रिकेत शांततापूर्ण व सनदशीर मार्गांनी साम्राज्यांना विरोध करणाऱ्या काळ्या छटांच्या लोकांना मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आश्रित म्हणूनच वागवले गेले.

२०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात या वांशिक वर्चस्वाच्या युक्तिवादाला वैज्ञानिक तथ्य म्हणून सिध्द करण्यासाठी संशोधनेही केली गेली व प्रतिष्ठित विज्ञान नियतकालिकांनी अशा शोधनिबंधांना प्रसिध्दीही दिली. एकंदरीतच विज्ञानाच्या इतिहासातला हा एक अत्यंत लाजिरवाणा काळ मानला जातो. पुढे जर्मनीत हिटलरने वंशवादाचा एक पराकोटीचा अतिरेकी आविष्कार जगाला दाखवला. पण म्हणून दुसऱ्या महायुध्दात हिटलरविरोधात उभे राहिलेले इतर युरोपीय देश काही सर्व मानवजात एक आहे असे मानणारे होते असेही नाही. २०२२ मध्ये नेचर या आघाडीच्या नियतकालिकाने या पापाची अंशतः भरपाई म्हणून विज्ञानातील वंशवादावर प्रकाश टाकणारा पहिला विशेष अंक काढला होता. जिज्ञासूंनी जरूर हा अंक पहावा.

अर्थात औद्योगिक क्रांतीने युरोपातील सर्व लोकांचे जीवन सुखकर केले असे म्हणणेही चुकीचे आहे. यांत्रिकीकरणामुळे आपल्या हाताच्या कौशल्यावर अवलंबून असणारे कितीतरी रोजगार नष्ट झाले. ग्रामीण भागात शेतीवाडी करून सरंजामशाहीतले

काहीसे सुरक्षित जीवन जगणाऱ्या अनेकांना बदलत्या परिस्थितीमुळे शहरांकडे स्थलांतर करावे लागले. कारखान्यांमधील यंत्रांच्या वाढत्या कार्यक्षमतेमुळे कामगारांचे काम कमी होणे दूरच, त्यांच्या कामाचे तास आणखी वाढवले जाऊ लागले. कारखानदार आणि कामगार यांमध्ये संघर्षही होऊ लागले.

याच पार्श्वभूमीवर १८४०च्या दशकात कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंजल्स यांनी साम्यवादी विचारधारा मांडण्यास सुरूवात केली. ‘कारखानदार व कामगार यांच्यामधील संघर्षामुळे युरोपात अंदाधुंदीची परिस्थिती निर्माण होईल व सरतेशेवटी विजय कामगारांचाच होईल’ असे भाकीत त्यांनी वर्तवले होते. त्यांचा साम्यवादाचा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यानंतर काही काळ खरोखरच युरोपात अत्यंत अशांततेचे वातावरण निर्माण झाले. पण राज्यकर्त्यांनी निष्ठुरपणे कामगारांची बंडे मोडून काढली. मात्र आर्थिक समानता जरी मिळाली नसली तरी या संघर्षांमधून काही राजकीय अधिकार निश्चितच समाजातील दुर्लक्षित असलेल्या घटकांना मिळाले. लोकशाही राज्यपध्दती व देशातील सर्व पुरुष नागरिकांना मताचा अधिकार अशा रचनेकडे




*साम्यवादाचा जाहीरनामा - जर्मन भाषेत प्रसिध्द झालेली पहिली आवृत्ती (स्रोत – विकीपिडिया)*

देशांची वाटचाल सुरू झाली. अर्थात महिलांना मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठी एक वेगळी लढाई लढावी लागली. मार्क्स व एंजल्स यांच्या विचाराने प्रभावित झालेले नव्या राजकीय भूमिका घेणारे पक्षही उदयाला आले. बऱ्याच देशांमध्ये कामगार हक्क, स्त्रियांचे व बालकांचे हक्क, एकंदरीतच मानवी हक्कांच्या संकल्पनांना कायद्याचे पाठबळ मिळाले. १९व्या शतकात जरी कामगारांना भांडवलशाही व्यवस्था मोडीत काढण्यात यश आले नाही, तरी साम्यवादी विचार राजकारणात निश्चितच रुजला.

काळाच्या ओघात काही देशांमध्ये साम्यवादी विचारधारेच्या राजकीय पक्षांच्या हाती सत्ताही आली व त्यांना साम्यवादावर आधारित अर्थव्यवस्था उभी करण्याची संधीही मिळाली. याची परिणती २०व्या शतकाच्या उत्तरार्धात भांडवलशाही देश व साम्यवादी देश असे दोन तट पडण्यामध्ये झाली. अर्थात शीतयुध्द नावाने ओळखली जाणारी ही विभागणी फार काळ टिकू शकली नाही. साम्यवादी अर्थकारणाची गेल्या काही दशकांत पीछेहाट झाली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा पाया आता भांडवलशाही हाच झाला आहे. रशिया व चीनसारखे काही देश स्वतःला साम्यवादी म्हणवत असले तरी त्यांचे अर्थकारण भांडवलशाहीतूनच चालू आहे आणि राजकीय व्यवस्था मात्र लोकशाहीचा संकोच करणाऱ्या एकाधिकारशाहीची बनली आहे.

युरोपीय वसाहतवाद्यांनी आपल्या अधिपत्याखालील आशियाई व आफ्रिकी देशांमध्ये राबवलेल्या युरोपकेंद्री धोरणांमुळे साधनसंपत्तीची संपन्नता असूनही आशिया व आफ्रिका कफल्लक बनले तर युरोपातील साम्राज्ये मालामाल झाली. जागतिक व्यापाराचा

केंद्रबिंदु आशियाकडून युरोपकडे सरकला. पुढे राजकीय साम्राज्यांची शकले झाली तरी नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांच्या आर्थिक नाड्या आपल्याच हातात राहतील अशा व्यवस्था तयार करूनच युरोपातील राज्यकर्त्यांनी आपली साम्राज्ये विसर्जित केली. आपल्या संपन्नतेच्या जोरावर ते स्वतःला विकसित म्हणू लागले तर इतर जगाला अविकसित ठरवू लागले. आपली सामाजिक-आर्थिक-राजकीय संरचना ही सर्व जगात सर्वश्रेष्ठ आहे व अविकसित देशांनी आम्ही दाखवलेल्या मार्गानेच प्रगती करायला हवी असा अट्टाहास युरोपियनांच्या वर्णवर्चस्वाच्या इतिहासातूनच आलेला आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर एकंदर जगाची या दोन सामाजिक-आर्थिक गटांत विभागणी झाली. गेल्या काही दशकांत या दोन गटांमधील दरी कमी कमी होत गेली असली तरीही आज २१व्या शतकातही आंतरराष्ट्रीय राजकारण याच दुभंगलेपणाभोवती फिरताना दिसते.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी - बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

लेखक : **प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

*(कळीचे शब्द: आफ्रिका, युरोप, भारत, चीन, रशिया, आशिया, अमेरिका, सागरी व्यापार मार्ग, आफ्रिकी गुलाम, बर्लिन कॉन्फरन्स, वंशवाद, शीतयुध्द, विकसित देश, विकसनशील देश)*

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. २०१८ सालापासून 'शैक्षणिक संदर्भ' हा इ-अंक इ-मेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील. आपला व्हॉट्सॅप क्रमांक कळवल्यास आपल्याला Sandarbh Readers या आमच्यावाचक गटामध्ये सामील केले जाईल. तेथेही आपण लेख व अंक वाचू शकाल.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.*

*या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा.. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

इ-पेमेंट : Sandarbh Society

Account No.: 20047006634

Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune

IFS Code: MAHB0000852

- ***संपादक मंडळ,शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***